# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 18 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १८ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या वक्तव्यावरुन विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे संसदेचं कामकाज आज बाधित झालं. अमित शहा यांनी काल राज्यसभेत संविधानावरच्या चर्चेला उत्तर देताना केलेल्या वक्तव्यावर, आज लोकसभेत काँग्रेससह इतर विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला. आज सदनाचं कामकाज सुरु होताच या सदस्यांनी हौद्यात उतरुन घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे सदनाचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब झालं.

राज्यसभेतही हेच चित्र पाहायला मिळालं. अमित शहा यांच्या वक्तव्याचा निषेध करत विरोधकांनी घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे राज्यसभेचं कामकाजही दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित झालं.

****

राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनात विधानसभेतही आज काँग्रेसचे डॉ. नितीन राऊत यांनी हा मुद्दा उपस्थित केला. केंद्रीय मंत्र्यांच्या वक्तव्याचा आपण निषेध करत असल्याचं त्यांनी सांगितलं. यावर भाजपचे आशिष शेलार यांनी हरकत घेतली आणि संसदेतल्या कार्यवाहीबाबत या सभागृहात बोलणं उचित नसल्याचं सांगितलं. त्यावर अध्यक्षांनी, हे वक्तव्य तपासून उचित कारवाई केली जाईल असं सांगितलं.

****

विधान परिषदेतही विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यसभेतला हा मुद्दा उपस्थित करुन चर्चेची मागणी केली. मात्र एका सभागृहाचा मुद्दा दुसर्या सभागृहात उपस्थित करता येत नसल्याचं सांगून, उपसभापती निलम गोर्हे यांनी ही मागणी फेटाळली. यावर विरोधी पक्षाचा सदस्यांनी गदारोळ केला आणि हौद्यात उतरुन घोषणाबाजी केली. या गदारोळातच उपसभापतींनी विरोधक डॉ बाबासाहेब

आंबेडकर यांच्या नावाचा गैरवापर करत असल्याचं म्हंटलं. त्यावर विरोधकांनी घोषणाबाजी करत सभात्याग केला.

दरम्यान, विधान परिषदेच्या अध्यक्षपदासाठी भाजपचे राम शिंदे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. १२ वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत होती, तोपर्यंत राम शिंदे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला आहे.

****

सोयाबीन, कापसाला योग्य भाव मिळत नसल्याचं सांगून विरोधी पक्ष सदस्यांनी आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केलं. सोयाबीन, कापसाला योग्य भाव नाही, धानाला बोनस नाही, अशी स्थिती असून, सरकारने शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करावा, अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी यावेळी केली.

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोग – एमपीएससी मार्फत वर्ष २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचं अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलं आहे. उमेदवारांनी अधिक माहितीसाठी आयोगाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असं आवाहन, महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं प्रसिद्धी पत्रकाद्वारे केलं आहे.

****

जगभरातल्या संगीत रसिकांसाठी पर्वणी असलेला पुण्यातला मानाचा ७० वा सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव आजपासून सुरू होत आहे. येत्या २२ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या संगीत सोहळ्यामध्ये शास्त्रीय संगीतातल्या अनेक दिग्गज कलाकारांसह १५ नवीन कलाकार प्रथमच या मंचावर आपली कला सादर करणार आहेत.

****

नांदेड जिल्ह्यातल्या माळेगाव यात्रेला येत्या २९ डिसेंबरपासून सुरुवात होत आहे. या यात्रेची तयारी पूर्ण झाली असून, यात्रा प्लास्टिक मुक्त करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी सांगितलं. या यात्रेच्या आढावा बैठकीनंतर त्या वार्ताहरांशी बोलत होत्या. या यात्रेत शेतकऱ्यांसाठी भव्य कृषी आणि पशु प्रदर्शन, कृषिनिष्ठ शेतक–यांचा सत्कार, अश्व, श्वान, कुकूट प्रदर्शन आणि विविध स्पर्धेचे उद्घाटन, कुस्त्यांची दंगल, पारंपारीक लोककला महोत्सव, महिला आरोग्य शिबिर तसंच शेवटच्या दिवशी लावणी महोत्सव आयोजित करण्यात आल्याची माहिती करणवाल यांनी दिली.

****

क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विननं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. आज ब्रिस्बेन इथं झालेल्या कसोटी सामन्यानंतर अश्विननं पत्रकार परिषदेत या निर्णयाची माहिती दिली. अनिल कुंबळे नंतर सर्वाधिक कसोटी बळी घेणाऱ्या अश्विनच्या नावावर ५३७ बळी आहेत. तसंच फलंदाजीत अश्विननं सहा शतकांसह तीन हजार धावा केल्या आहेत. ३०० कसोटी बळी आणि तीन हजार धावा अशी अष्टपैलू कामगिरी करणारा अश्विन क्रिकेट जगतातला ११ वा खेळाडू ठरला, तर ११ वेळा मालिकावीर किताब पटकावत अश्विननं मुथय्या मुरलीधरनच्या विक्रमाशी बरोबरी साधली होती.

****

दरम्यान, बॉर्डर–गावस्कर मालिकेतला तिसरा कसोटी सामना अनिर्णित राहिला. ऑस्ट्रेलियानं पहिल्या डावात ४४५ धावा केल्या होत्या, प्रत्यूतरात भारतीय संघानं पहिल्या डावात २६० धावा केल्या. वारंवार पावसाचा व्यत्यय आलेल्या या सामन्यात दुसऱ्या डावात भारतीय गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियाला सात बाद ८९ धावांवर रोखलं. भारतासमोर विजयासाठी २७५ धावांचं आव्हान होतं. मात्र, भारतीय संघाच्या आठ धावा झाल्या असतानाच पाऊस आणि खराब प्रकाशामुळे खेळ थांबवावा लागला. पाच सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघ एक – एकनं बरोबरीत असून, मालिकेतला चौथा सामना मेलबर्न इथं २६ तारखेपासून खेळवण्यात येणार आहे.

****